**<u>प्रेसनोट दिनांक २९/०६/२०१९</u>**

**<u>उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर</u>**

**पोलीस ठाणे यांनी हद्दीतील व्यापारी संघटनेतील मेडीकल दुकानदार, स्वीट दुकानदार कपड्याचे व्यापारी यांची हेल्पलाईन व घरफोडीच्या वाढत्या घटनांचे अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत बैठक घेतली बाबत.**

दिनांक २७/६/२०१९ रोजी वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यु.बी.शिंगाडे, उत्तमनगर पोलीस ठाणे यांनी हद्दीतील व्यापारी संघटनेतील मेडीकल दुकानदार, स्वीट दुकानदार कपड्याचे व्यापारी यांची वैठक घेण्यात आली. सदर वेळी पो. स्टे. हद्दीतील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सारंग राडकर तसेच ३५ ते ४० प्रतिनीधी हजर होते.

बैठकीदरम्यान उपस्थितांना पुणे पोलीस आयुक्तालयाचे वतीने नव्याने सुरु करण्यात आलेल्या हेल्पलाईन बाबत थोडक्यात माहीती दिली. तसेच घरफोडीच्या वाढत्या घटनांचे अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचित केले व गर्दीच्या ठिकाणी अनुचित प्रकार होणार नाही याबाबत दक्षता घेणे, संशयित वस्तु अगर इसम आढळल्यास त्वरीत पोलीसांना कळविणेक, दुकानांमध्ये व सोसायटीमध्ये सी.सी.टी.व्ही लावणे, अफवांवर विश्वास ठेवु नये. इत्यादी सुचना केल्या.

त्याचप्रमाणे उपस्थित व्यापारी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना पथारीवाले यांच्याकडुन रस्त्यावार विक्रीकरीता ठेवण्यात येणाऱ्या वस्तुमुळे वाहतुक कोंडी होत असुन पुणे महानगर पालिका यांना पत्र व्यवहार करुन देखिल त्यांचेवर कारवाई होत नाही या बाबत सांगण्यात आले असता त्याचे निरसन करुन पोलीस विभागामार्फत देखिल पत्र व्यवहार करुन कारवाई करण्यात यावी या करीता कळविण्यात येईल असे आश्वासन दिले आहे. तसेच त्यांना काही अडचण आल्यास पोलीस ठाणे येथे तात्काळ सुचना देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्तालयामध्ये स्थापन करण्यात आलेले भरोसा सेल बाबत माहीती देवुन भरोसा सेलचे कार्ड वाटप करण्यात आले आहे.

## प्रेसनोट दिनांक २९/०६/२०१९
## उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर

दि.२५/०६/२०१९ रोजी उत्तमनगर पोलीस ठाणेकडील एन.डी.ए मार्शलवरील कर्मचारी पो.ना. नांगरे व पो.ना पांढरे हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना कोंढवे धावडे, पुणे या ठिकाणी १० ते १५ वर्षाचा अंगात लाल रंगाचा चेक्स चा शर्ट असलेला मुलगा एकटाच फिरत असताना मिळुन आला. त्याच्याकडे त्यांनी चौकशी केली असता त्याला त्याचेबाबत काही एक सांगता येत नव्हते तो मंदीमंद असल्याचे समजले. म्हणुन त्यांनी सदर मुलास एन.डी.ए पोलीस चौकीस घेवुन आले. त्यानंतर चौकी अंमलदार पो.हवा. येनपुरे यांनी सदर मुलाच्या शाळेच्या शर्टच्या खिशावरील श्री. छत्रपती प्रतीष्ठान संचलित शासनमान्य निवासी मतीमंद विद्यालय आनंद विहार कॉलनी, हिंगणे खुर्द, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड पुणे असा लोगो दिसुन आल्याने,सदर मोबाईल नंबरवर संपर्क करुन त्यांना सदर मुलाबाबत माहीती दिली.

त्यानंतर थोड्या वेळाने सदर शाळेचे मुख्याद्यापक शशीकांत दादाभाऊ गाडेकर हे एन.डी.ए. पोलीस चौकीस हजर झाले तेव्हा त्यांनी सांगीतले की, सदर मुलाचे नाव वैभव काळुराम येवले,वय-१४ वर्षे असे असुन तो मतीमंद आहे. सदर मुलगा शाळेतील मुलांना खेळण्याच्या तासाला बाहेर सोडले असता खेळत-खेळत कोठेतरी निघुन गेला. म्हणुन आम्ही त्यांचा शोध घेत असताना तुमचा फोन आला. सदर मुलास खात्री करुन त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.